# आयुष्यकोश

साधारणतः दीडशे वर्षांपूर्वी **चीफ सीएटल** या सुजाण आणि सर्वमान्य रेड इंडियन रहिवाशाने वॉशिंग्टन शासनाला, जे त्यांच्या जमिनी बळकावू इच्छित होते, एक खरमरीत संदेश पाठविला. पर्यावरणावर एवढया कुशलतेने केलेले हे कदाचित एकमेव भाष्य असेल.

तुम्ही आकाश कसे खरेदी करू शकाल ? चीफ सीएटलने सुरूवात केली.
वारा पाऊस यांवर सत्ता कशी गाजवू शकाल ?
माझी आई मला सांगत असे ...
पृथ्वीचा प्रत्येक भाग पवित्र आहे.
पाईन वृक्षाचे प्रत्येक पान ...
वालुकामय प्रत्येक समुद्रकिनारा...
घनदाट जंगलातील धुक्याचा प्रत्येक पडदा...
प्रत्येक कुरण आणि गुणगुणणारे भ्रमर...
हे सर्व आम्हा लोकांना वंदनीय आहेत.

माझे वडिल मला सांगत असत...
वनस्पतींमध्ये वाहाणारा जीवनरस...
हा माझ्या शरीरातील धमन्यांमधून वाहाणा-या रक्तासारखाच आहे.

आपण या पृथ्वीचा एक भाग आहोत आणि ती आपला एक भाग आहे.
सुगंधी फुले ही आपल्या भावंडांप्रमाणे आहेत.

अस्वल, हरीण, गरूड हे देखील आपले भाऊबंद आहेत.
पर्वतशिखरे, कुरणे, घोडे हे एकाच कुटुंबाचे घटक आहेत.
माझ्या पूर्वजांची वाणी मला सांगत असे...
नदयांवरून व तलावातून वाहाणारे चमचमणारे पाणी...
हे फक्त पाणी नसून तुझ्या आजोबांच्या आजोबांचे रक्त आहे.
तलावांमध्ये भुतासारखे पडणारे प्रत्येक प्रतिबिंब आपल्या पूर्वजांची कोणतीतरी अनोखी कहाणी सांगत असे.

पाण्याचा पडसाद हा तुझ्या आजीचा खापरपणजीचा आवाज आहे.
नदया आपल्या बहिणी आहेत. त्या आपली तहान भागवितात.
त्या आपल्या होडया वाहातात आणि आपल्या मुलांना पोसतात.
तुम्ही भावंडांप्रमाणे त्यांच्यावर माया करायला हवी.

माझे आजोबा मला सांगत असत...
हवा अनमोल आहे. ती स्वतःचे चैतन्य सर्वांना देते.
मला पहिला श्वास देणारी हवा माझा शेवटचा श्वास सुद्धा कवेत घेते.
तुम्ही हवा आणि जमीन वेगळी पवित्रपणे जपायला हवी.
त्या जागेवर एखादा माणूस फुलांमुळे सुगंधित झालेल्या हवेचा श्वास घेऊ शकेल.

शेवटचा रेड इंडियन पुरूष आणि स्त्री त्यांच्या जमिनींसकट नाहीसे होतील......
आणि त्यांची स्मृती म्हणजे फक्त शेतांवरून तरंगणारा एखादा मेघ एवढीच राहील .
तेव्हा अरण्ये आणि समुद्रकिनारे राहातील ?
माझ्या लोकांमध्ये काही चैतन्य राहील का ?
माझ्या पूर्वजांनी जे सांगितले आहे . जे मला माहिती आहे .
**की पृथ्वी तुमची नाही तर तुम्ही पृथ्वीचा अंश आहात .**

माझ्या आजीचा आवाज मला सांगत असे...
तुम्हाला जे शिकविले गेले आहे ते तुमच्या मुलांना शिकवा .
पृथ्वी ही तुमची माता आहे .
जो प्रसंग पृथ्वीवर गुदरेल तोच पृथ्वीतलावरील प्रत्येक मुलावर गुदरेल .

माझे आणि माझ्या पूर्वजांचे म्हणणे ऐका...
तुमच्या लोकांचे नशीब हे आम्हाला एक गूढ आहे .
सर्व म्हशींची कत्तल झाली तर काय घडेल .
जेव्हा जंगली घोडे पाळीव बनतील... .
जेव्हा जंगलातील सुप्त कानेकोपरे माणसांच्या घामट वासाने गजबजून जातील .

जेव्हा हिरवीगार पर्वतशिखरे तारांच्या जाळयांनी आच्छादली जातील .
जेव्हा झुडुपे नाहीशी होतील .
जेव्हा गरूड नाहीसे होतील .
जेव्हा चपळ घोडे आणि बैल हे आपल्या आयुष्यातून नाहीसे होतील तेव्हा काय घडेल ?
तेव्हा आपले जगणे संपेल आणि केवळ स्वतःचे अस्तित्व टिकविण्याची केविलवाणी धडपड चालू राहील .

हे आपणा सर्वांना माहिती आहे .या सर्व गोष्टी आपल्या रक्ताप्रमाणे एकमेकांना जोडलेल्या आहेत .
आपण आयुष्याचा कोश विणत नाही .
त्या कोशाचा आपण फक्त एक धागा असतो .
आपण त्या कोशाला जे काही करू
ते अंतिमतः आपण स्वतःलाच करत असतो .
नवजात बालक त्याच्या आईच्या हृदयाच्या ठोक्यावर जितके प्रेम करते तद्वत आपण या पृथ्वीमातेवर प्रेम करतो .

आम्ही ही जमीन तुम्हाला विकली तर आम्ही ती जपली आहे त्याप्रमाणेच ती तुम्ही जपा .

तुम्हाला ही जमीन ज्या स्थितीत मिळाली तशीच तुमच्या स्मृतीत ती अखंड राहील याची काळजी घ्या .

ही जमीन वारे आणि नदया तुमच्या मुलांच्या मुलांसाठी जतन करा आणि

आम्ही तिच्यावर जसे प्रेम करत आलो तसेच तुम्ही करा .